म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४९१



REFBK-0024009
REFBK-0024009

# अरुण कृष्णाजी कांबळे

संदर्भ काव्य
२४९१
२४००१

# अरुण कृष्णाजी कांबळे

१४/१०/८३

कविता : १९७० – ८३

REFBK-0024009
REFBK-0024009

संकल्प प्रकाशन

प्रकाशन क्र. ५

© प्रा. अवनी अरुण कांबळे
‘ त्रिकाल ’, ३०८/६८३३,
पंतनगर, घाटकोपर ( पूर्व )
मुंबई ४०००७५

भाषांतर व पुर्नप्रसिद्धीचे हक्क स्वाधीन

पहिली आवृत्ती जून १९८३

मूल्य १०·०० रुपये

मुखपृष्ठ : उमेशचंद्र अहिरे

मुद्रक :
सा. रा. भंडारी
भंडारी मुद्रणालय
२७१ नारायण पेठ, पुणे ४११ ०३०.

प्रकाशक :
सुदेश हिंगलासपूरकर
संकल्प प्रकाशन
४६/१३९१, नेहरू नगर
कुर्ला ( पूर्व ), मुंबई ४०००२४

अरुण कृष्णाजी कांबळे

भाई माधवराव बागल

व

प्राचार्य म. भि. चिटणीस

या ज्येष्ठ समतावाद्यांना—

आभार

सुधाकर गायकवाड
प्रा. डॉ. गंगाधर पानतावणे
उमाकांत रणधीर
प्रा. डॉ. व. दि. कुलकर्णी
प्रा. म. द. हातकणंगलेकर
प्रा. स. शि. भावे
प्रा. डॉ. भालचंद्र फडके
प्रा. गो. म. कुलकर्णी
उमेशचंद्र अहिरे
प्रमोद कुलकर्णी
सा. रा. भंडारी
सुदेश हिंगलासपूरकर
सुनील कर्णिक

निमित्त बापजादे / ९
आदिबंध / ११
गद्दार / १३
बोली / १५
भगाटा / १६
आपणच पाहात जावे आपल्याला / १७
खाचा / १८
शब्द / २०
जंगल / २२
दलितांनो / २४
मी चाललो होतो / २६
मांग गारुडी / २७
या प्रेमाला अर्थच काय ? / २९
झाड / ३३
गॉर्की / ३४
झुंबर / ३६
डाइंग सन / ३६
लोळ / ३८
ज्वाळांचे चाळ / ३९
निग्रो, अस्पृश्य-बुराकूंसाठी / ४०
लाल तांबडी नंबरी दिवे / ४१
उत्पात / ४३
आम्ही जे जीवन जगतो / ४५
चे गव्हेरा / ४६
तुझ्यासाठी दोन अश्रू / ४७
धरणी जळताना / ४८
तुम्ही जयभीम म्हणाल तर / ४९
डॉ. बाबासाहेब आंबेडकर / ५१
या संग्रहाच्या निमित्ताने : प्रा. भा. दि. फडके / ५४
स्वागत : सुधाकर शि. गायकवाड / ६०

पूर्वप्रसिद्धी

अस्मितादर्श, आम्ही, पूर्वा, मागोवा, सत्यकथा,
पँथर कविता, धम्मचक्र

## निमित्त बापजादे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४९१
काव्य २४००९
१४।७।८३
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

' त्यांच्या स्वप्नांना ही इतकी झेप नसावी '
अज्ञातातील असंख्य पूर्वजांचा मर्मभेद करणारा
हा वाक्यांश....
आकाशात सर्वत्र

वाकलेल्या मणक्यांचे आकाशभर सांगाडे
आणि नांगरून ठेवलेल्या जमिनीतील गवतसाठे
सर्वत्र पसरत जातात प्रकाशाचे संदर्भ
आणि आकाशवलये विस्तारत जातात
धुमकेतूतून.

—तुमच्या स्वप्नातील गर्भ पुत्रवत होत नसतील
आमच्यात कशावरून
कशावरून तुमच्या घामातील धारांचे पाऊस
बरसत नसतील आमच्यातून
विद्रोही मेघ होऊन धुवांधार
कशावरून तुमच्या खांद्यावरील वाट
नाचत नसेल आमच्या कार्यकर्तृत्वात
सर्जनशीलतेचा अनुबंध लेऊन
पायाखाली
बापहो ! तुमच्या वेदनांचे पक्षी
नसतीलच का उडत आमच्या खांद्यावरून

आणि डोळ्यातील तहान रक्तात;
तुमच्या कापलेल्या जिव्हांचे अवशेष
माझ्याही रक्तमांसात

: आणि तुमच्यापासून खूप दूर मी
तुमची स्वप्नेही पोहोचत नाहीत तिथं
तुमच्यापासून कितीक योजने दूर
आणि कितीक जवळ.

## आदिबंध

कोणत्या पिढीपासून
कोणत्या पिढीपर्यंत हा प्रवास
नि मी हा असा
सगळ्यांचं तेज आणि अंधार साठवून
का वागवतोय ही त्वचेची खवलं
आणि निःश्वसितं
काळाला कवेत घेऊन भूल चालणारी
हे निद्रानाश नि सुषुप्ती
कोण्या बुवाच्या दाढीखालून आलेली
आणि उत्खननात सापडलेला हा चेहरा
कोणत्या नात्याशी राखतोय इमान
....आणि आकाशातून शुभ्र हंसांचा थवा
दौडत चाललाय.
हे सोलीव द्राक्षांचं पेटलेलं बन.
कोणत्या मुलखाला लावायचीय आग
कुठल्या मुदपाकखान्यात बनलंय शरीर
ओलेत्यानं की सोवळेपणी
आणि हा शुभ्र हंसांचा थवा.
हे सगळंच कसं एकजुटलंय जणू !
किती ही पांगाऱ्यांची झाडं....

“ मला तुला डोळे भरून पहायचंय
मला तुला कविता ऐकवायचीय
मला तुझं पोर्ट्रेट करायचंय
मला तुझ्याशी लग्न करायचंय....”

तू अशीच फीर सूर्यफुलं घेऊन
नि विझव त्यांचे चेहरे.
तू त्या अदिम परंपरेतली आहेस.
तुला विषकन्या तरी कसे म्हणू.
का राखतेयस इमान या उत्खननातील सांगाड्याशी ?
तुझा धुळीत माखलेला चेहरा फिरव
नि उद्धर हे जीव
बाजारात शिळा होऊन पडलेले.

का कुणास ठाऊक पोरी
मला तुझ्यात हजारो वर्षांचा उत्खननात सापडलेला
जुना-पुराणा सांगाडा दिसतोय;
सृजनाच्या प्रक्रियेला वरदहस्त देणारा
विश्वाचा आदिबंध
तुझ्या रूपानं साकारतोय.

## गद्दार

वेशीबाहेर कोंडलेले आमचे आयुष्य
हसते आहे आम्हालाच खदखदा आज !
अरे, यांनीच तुडवलंय बुद्धाच्या शिष्यांना
हत्तीच्या पायाखाली
यांनीच ठोकलंय येशूला क्रुसावर
गॉलगोथाच्या टेकडीवर
यांच्याच पित्यांनी मारलंय शंबुकाला
तपश्चर्या करताना
आणि मार्टिन ल्यूथर किंगला सुद्धा.
हे सारे आमचे दावेदार !
वाघांनो
तुम्हीच पिळल्यात वैधव्याच्या चरकात
आपल्या आयाभैनी
तुम्हीच ढोसलंय त्यांना काठीनं आगीच्या डोंबात
अरे, तुम्ही मन झडलेले महारोगी
तुमच्या सहानुभूतीची गरज कुणालाय
आम्हीच झालोय आज प्रकाशपुत्र
आम्हाला स्पष्ट दिसतोय आमच्या उद्धाराचा मार्ग
मनुष्यमात्रांचे शत्रू आणि उद्धारक मित्र सुद्धा
—तुम्ही मारल्यायत गप्पा
एकीच्या, मानवतेच्या आणि भागवत धर्माच्या
भजनात एकी आणि भोजनात बेकी

हा तुमचा धर्म
घणत पडलेल्या शिळ्या चपातीसारखा
ज्याला कुत्रंसुद्धा खात नाही

आज आम्ही गद्दार झालोय
तुमच्या संस्कृतीशी, ढोंगी मानवतेशी आणि वांझ धर्माशी सुद्धा
समुद्र खवळलाय
आमच्या मुक्तीच्या घोषणांचे हिल्लोळ
देतील धडकी तुमच्या ढोंगी संस्कृतीवर
आणि करतील प्रक्रिया सर्वांवर
समुद्राच्या समानतेची
आज आम्हाला प्रकाशाचं शीड उभारलेलं
स्वातंत्र्याचं गाव दिसतंय.

## बोली

मसणात गुडसा चघळीत बसलेला
माझा आज्जा
माझ्या देहाचा पर्मनंट मेंबर
परंपरेचं बिऱ्हाड
पाठीशी घेऊन बोंबलतोय,
' बांबलीच्या, जरा आपली बोली बोल—

बोल म्हंतो ना ! '

वेदांची पोथी चिवडीत
शेंडीला तूप लावून
बामण मास्तर मला म्हंतो,
' शिंच्या, जरा शुद्ध भाषा बोल ! '

आता तुम्हीच सांगा,
मी कोणती बोली बोलू ?

## भगाटा

काल सकाळी एक म्हातारी
माझ्या दाराशी आली
डोळ्यात उजाड दुष्काळ
चेहऱ्यावर दुष्काळाच्या चिरम्या
माथ्यावर पांढरीफक्क वादळं

‘ दे बाबा पोटाला काई बी.
माझ्या लेकरासारखा दिसलास
म्हून आले....
आवंदा काई बी पिकलं न्हाय
भगाट्यानं— ’
आणि तिच्या डोळ्यांनाच वाचा फुटली

.... .... ....

घे बाबा दुष्काळा,
तुझ्या ठेवणीत ही एक ठेव.

## आपणच पहात जावे आपल्याला

आपणच पहात जावे आपल्याला
समुद्रखोल
सगळ्या संवेदना तीक्ष्ण ठेवून

: ऐनेमहालात उभे रहावे स्वतःच्याच
डोळे झळाळणाऱ्या
अंधारगुहांचे प्रदेश न्याहाळावेत स्वतःच
गुहाखोल डोळ्यांनी
काळोखपुत्र होऊन
आणि जुळवावेत संदर्भ
एका पुरावास्तवाचे अवशेष आपणही म्हणून

एक दिगंत वेदनाच होऊन आपण
व्यक्त होतो चिरकालाची
की एकाकी प्रकाशशलाका
अंधाराच्या गाभ्याला चिरत जाणारी

खरं म्हणजे
एका टोकापासून दुसऱ्या अज्ञात टोकापर्यंत
सुरू असलेल्या प्रवासातील
एक टिंबांकित बेट
आपण.

## खाचा

: १ :

हजारो हिरोशिमा सरपटतायत माझ्यातून
आदिम अवस्थेपासून माझ्या इंद्रियांतूनच
तुटलियंत शहरं
माझीच कलेवरं तमाम रांगांतून
फुटलेल्या रक्तगाठींच्या लोंढ्याच्या पुरात
माझाच होतोय खुर्दा.

: २ :

मी पाहिल्यायत उध्वस्त नगरातून
पेरलेल्या रक्तगाठी,
खच अस्तित्वाचा,
विनामूल्य पाण्यासाठी वहाणारी प्रेतं.
इथंच खुडलेयत डोळे :
डोळे टपोऱ्या गुलाबासारखे.
डोळे नसतो रंग
फिरतात सभोवार वास्तवाचे नानाविध रंग टिपीत.
साला डोळा म्हणजे नुसतं पाणी.
पाणीच फेकलं रस्त्यावर
'हां, प्या !' म्हणून.
मी उध्वस्त हिरोशिमा उरात घेऊन.

: ३ :

जमीन उसवताना
स्थित्यंतरं पहातोय
उघड-झाप
झाड वाढतंय अंगांगातून
मेंदूत उडालाय भडका
आग

लाह्या फुटतायत आगीच्या

## शब्द

आज माझा प्रत्येक शब्द
आभाळ झालाय

मी सडून होतो – पडून होतो – कुढून होतो –
इतक्यांदि अर्थच नव्हता माझ्या शब्दाला.

माझा शब्द : एक गोणपाट
कोनाड्यात पडलेले.
पडलेच उपयोगी
तर कधीमधी घर पुसायला
किंवा पोचारा.

मला ठाऊकच नव्हते शब्दांचे आभाळपण
कारण तुम्ही शब्दांनाच बांधलं दवणीला.

कसे सांगू तुम्हाला
शब्दावाचून दिन सुने जाताना
काळजाचे कसे कोळसे झाले ते

कळणार नाही माझ्या बाबांनो
हा तळहातावर जपलेला
पाळण्यात जोजावलेला

साता संमिंद्राच्या पल्ल्याडला माझा शब्द—
शब्द नाहीयच तो
लहलहणारा जळजळीत लाव्हा
जर उच्चारलाच नाही तो
तर त्वचेलाही फुटतील शब्दांचे धुमारे !

आज चौखूर उधळलेला माझा शब्द—
कसे सांगू तुम्हाला,
आज माझा प्रत्येक शब्द आभाळ झालाय !

## जंगल

मी कोंडून आहे
या विवस्त्र महाकाय-अजानुबाहू झाडीत
एकवीस वर्षे नऊ महिने नऊ दिवस.
परिघांवरचे पितळी पहाड
वितळताना माझ्या विरुंद विवरात
महाप्राण व्यंजने गोठवतात
माझ्या अस्तित्वाचे कोंडवाडे

या झाडीच्या पल्याडातून
एक सांद्र निथळ घंटा
शरीरभर वहातेय
जिचे अस्तित्व अनादि अनंत

मी आल्यापासून पहातोय
अगम्य शिलालेखांची प्रचंड वलये
आणि हे निर्वासित जंगल
ज्याचा मागमूस मला ठाऊक नाही.

दूरस्थ वस्तूंचे काहींदा वळवळणारे
अतिप्राचीन ठसे
आणि हा सनातन घंटारव
दिसामासांनी वाढवतोय
माझ्या आकारावरची त्वचेची वारुळे

ही अमीबासारखी पसरत जाणारी
निराकार समुद्ररेषा....

मी काय सांगू—काय सांगू—
या प्रचंड वज्रकाय झाडीत
मला कोंडून घातलंय

## दलितांनो !

चारचौघांकडे बघून जगताना
जाळू नये वाटतात तुमची भ्याड
प्रेतेदेखील !

पण वाटते कधी कधी
लावावी तुमच्या नपुंसक मनांनाच काडी
जी पहातात उघड्या डोळ्यांनी
आयाबहिणींचे नागडे देह
रस्त्यातून धिंड काढताना
आणि बलात्कार होत असताना;
वरून मख्खपणे तूप ओतताना !

अरे ! तुमचे षंढत्व देखील
लाजून मान खाली घालेल
असे यांचे अत्याचार !
आणि प्रेतदेखील खवळून उठेल
हातात त्यालाच जाळते काष्ठ घेऊन
असे यांचे आचार !

बुणगे तुम्ही....
या बुणग्यांच्या जगात जगताना
जाळून घ्यावे वाटते
स्वतःला भरचौकात—
निदान तुमची थंड शरीरे तरी तापतील
माझ्या देहाच्या शेकोटीजवळ
जमा होऊन बघताना !

## मी चालतो होतो

मी चालतो होतो :
खांद्यावर खाकी गणवेष,
हातात गन
अन् शेजारी अल्सेशियन.

' रे, ऐकलंस नं
मी येते आहे. '
' हं. '

आम्ही चालतो होतो.

' ए, ती पाहिलीस
झाडांची गर्द सावली
आणि त्यांचं सलगीनं
उभं रहाणं—! '

' हे, बघ, तो दिसतोय ना
समोरचा खारा समुद्र,
वरचं शुभ्र निळं आकाश
आणि त्यात नांगरून ठेवलेली
माझी वाट पहाणारी गलबतं ?
तिथं आपल्याला जायचंय. '
' हो. '

माझा अल्सेशियन भुंकत होता.

## मांग गारुडी

अनंत लढायांच्या खुणा
आपल्या चेहऱ्यावर बांधून
करपलेल्या डोळ्यांचा
हा खाकी पुरुष :
मांग गारुडी.

का कुणास ठाऊक
याच्या चेहऱ्याचं गणित
मी मांडीत बसतो
तेव्हा माझ्या डोळ्यापुढं गर्दी करून बसतात
मेणचटलेली पालं
अर्धनग्न स्त्रिया
रस्त्यावर मांडलेले तीन दगड
आणि ओशाळलेले हसू ( आसू : दोन्ही एकच ).

मी पहिल्यांदा आलो वस्तीत
तेव्हा एक टिपिकल म्हातारी दिसली मला
( शोधूनही मिळणार नाही अशी स्त्री पोर्ट्रेटसाठी )
शिळ्या चपातीसारख्या चेहऱ्यानं विडी
फुंकणारी.
आपलं ढुंगण थोडं बदलून
माझं स्वागत केलं तिनं.

वस्तीवरची पोरं फदाफदा जमली :
नागड्यांच्या वस्तीला
उघड्यांचा पत्कुर !
....आणि माझ्या पापणीतून
सोललेली उल्टी धडं
पटापट बोलू लागली

म्हातारा आला ( तर्र प्याला होता. )
नुक्ताच झोपेतून उठून—
'....मास्तर, आलाव तुमी ?
मगनी या.
मी आता वंगाळ काम केलंय देवा....'
म्हातारा वाकला.
त्याच्या पाठीवरचा काळोख सत्तर वर्षांचा होता
आणि त्याच्या पांढऱ्या मिशीतून प्रकटणारं
कारुण्य
माझ्या ओंजळीत पकडून
मी आलो....रक्तीसारखं.

आता कितीही धुतले
तरी माझे हात स्वच्छ होणार नाहीत.

## या प्रेमाला अर्थच काय ?

'या प्रेमाला अर्थच काय ?
जेथे संवादच नाही
तेथे छेडणारच कसा मंजूळ स्वर ?'
—वांझ एकाकीपणाच्या वाट्याला
येणाऱ्या क्षणांना
मी सावधपणे सवाल करतो

परंतु नसतंच इतकं सरळ मन;
ते वहातं नागमोडी.
सरळ दिशांनी जाणारी प्रश्नोत्तरं
त्याला समजत नसतात.
आणि समजत असती
तर हे असं का ?

एवढा कोपराही तू माझ्यासाठी ठेवू नयेस
मी मात्र माझे संपूर्ण अस्तित्व—
किती प्रकारांनी सांगावी तीव्रता....
कळायला हवी असं वाटलं
तरी कोणत्या बाजूंनी कळवू तुला ?

बुडवूनच टाकलं मी तुला
माझ्या हृदयात
आणि मग हे असं का ?
तुझं तटस्थ काठपण....
पोहोचूच नयेत का माझ्या मनाचे पूर
तुझ्या गावाला ?

आणि मग मला कसं वाटलं
की गाव चक्क पुरानं वेढलंय
—याला म्हणायचा का वेडेपणा ?
आणि मग एक अनुत्तरित प्रश्न—
' वेडा आणि शहाणा यांतला खरा
शहाणा कोण ? '

हे समर्थन तर नाही ना स्वतःचं
आणि असं वाटावं यातच कुठेतरी
स्वतःची असमर्थता नाही का ?

किती बाजूंना शोधतोय स्वतःला
आणि लागतच नाही तळगाळ
आणि बुडालेली तू
हाही एक भ्रमच आहे हे समजूनही
का शोधतोय मी तुला खोल खोल ?

तुझी अस्तित्वविहीनताच
राहिलीय माझ्या पोकळीत भरून
जी अनंतकाळपर्यंत माझ्या सोबतीला राहील
कारण शेवटी मी काय केलं
प्रेम केलं म्हणजे....
मी कुरवाळीत राहिलो स्वतःच पाळलेलं
एक गुबगुबीत पिल्लू
अनिवारपणे
खरं म्हणजे ते स्वतःलाच कुरवाळणं होतं
कदाचित स्वतःच्या समाधानासाठी.

हे सगळे संदर्भ अत्यंत तर्कशुद्ध पद्धतीने
मांडायलाच पाहिजेत का ?
काही प्रमेयं कधीच सोडवता येत नाहीत
कधीच सोडवता येत नाहीत
कधीच सोडवता येत नाहीत

ही गुंतागुंत किती दिवस चालणार ?
सगळेच रस्ते चुकीच्याच दिशेचे
हे ठाऊक असूनही कशासाठी
हा निष्फळ प्रयत्न ?

मला जगता येत नाही
खोटी कातडी पांघरून
आणि दाखवूच शकत नाही
मी माझं हृदय उलगडून
शरीरशास्त्रदृष्ट्या.

एकदाचा आहे हा प्रवास
आणि हे असं का ?

कधीच भेटणार नाही आपण पुन्हा
कधीच.

संपूर्ण विश्वाच्या जडणीघडणीतली
ही एक अखेरची गोष्ट....
आदिपासून अंतापर्यंतची
ही इतकी भयंकर गोष्ट असून
का सांगता तुम्ही मला गप्प रहायला ?

मला सहनत नाहीत
हे आकाशीचे भाले,
माझ्या कंठात बुडणारा आक्रोश
फोडत नाही आकाशाचा काठ....
एकदाच ओरडतोय मी देठापासून
कारण माझ्या सर्वच शक्ती
मी लावल्यायत पणाला

काही आवाजांना प्रतिध्वनी नसतो
काही आवाजांना प्रतिध्वनी नसतो
काही आवाजांना प्रतिध्वनी नसतो

## झाड

केव्हाच झडून गेलाय या झाडाचा बहर;
आता वांझोट्या वेदनांचे कलेवर फक्त.

झाड हलतं झाड डुलतं
झाड रात्री अनावर किंकाळ्या मारतं
भूगर्भाला आळवतं
सकाळी गाणं म्हणतं झाड
बोलावण्यासाठी पक्ष्यांना आपल्या हाताखांद्यावर बसायला.

झाडाचं निमित्त दुखतं
वाळली जखम कुरवाळतं झाड
आकाशग्रस्त इमले बांधणारे हात
कुष्ठरोगी पाहून
झाड खराखरा जमीन उकरतं

झाडाची वेदना झाडालाच ठाऊक
जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४०१
वा. क्र. २४००१
काव्य
१४।१०।८३
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## गॉर्की

हा बेबंद आक्रोश
हे रोज भरणारे तुरुंगांचे पेटारे
कानावर आदळणारा भूकिस्त तडफडाट....
माझ्या जोशिल्या मनगटातूनही
आज अश्रू गळताहेत—
फोडावे वाटते मनगट कडकडा
मजुरांच्या छन्नीने फुटणाऱ्या खडीसारखे !
मीच धरलेली लेखणी
मोडून विखरावीशी वाटते.
हे हृदय चिरणारे आक्रोश ऐकून
रोज माझ्या स्वप्नात गॉर्की येतोय
तंग फ्रॉक कोट चढवून
त्याच्या बुटक्या पोलादी दमदार सरदारासह
ज्याच्या कर्तृत्वाला लाली होती
जिभेवर घोळणाऱ्या ‘ र ’त गती होती क्रांतीची
अन् मुठीत गुलाल होता उत्साहाचा.
मूठ आपटली की टेबल विजेरून जाई !
आज क्षितिजावर तो सरदार आलाय
त्याची पावलं टापटापतायत

ती सारवलेली लाल कडा त्याचं स्वागत करतेय....
मी उसासतोय,
गॉर्की—गॉर्की—गॉर्की—
माझा गॉर्की कुठाय ?

## झुंबर

हृदयात फुललेलं आरस्पानी झुंबर
माझ्या आयुष्याच्या छतावर
हिंदकळणारं.

काळ–काम–वेगाचं गणित
मला मांडता येत नाही

याच्या प्रत्येक झंकारानिशी
हृदयाच्या कारंजाचा
रंगमहाल फुलतो

रक्तामांसाचं पाणी घालून
वाढवलेलं हे झुंबर
असं मृत्युघंटेसारखं कां झालंय.... ?

काव्यांचा वैभवशाली मुकुट चढवून
या झगमगत्या यातनांच्या ऐनेमहालात
दरबारात बांधलेलं झुंबर—

सबूर, मी सिंहासनावर बसलोय.

## डाईंग सन

म्हणतात, सूर्य मरत आहे.
चला, बरे झाले
आम्हीही सुटलो म्हणा एकदाचे.

नाही तरी तीळ तीळ मरणे
आम्हाला काही नवीन नाही;
आता हे प्रभो सूर्यनारायणा
ही पाळी तुझ्यावरही आली.

पसरत चाललाय एक एक ब्लॅकस्पॉट
फिके फिके होत चाललेय तेज.
नाही तरी काय,
Man Contributes his own tragedy.

पण सूर्यालाही क्षय व्हावा....
( क्षय सूर्यालाच होतो असेही ऐकले आहे. )

—आमचे नाते सूर्यकुळाशी जुळते
हेही एकूण बरेच झाले

## लोळ

....आणि एका भल्या पहाटे
तो प्रचंड लोळ
कडाडला
तेव्हा दाही दिशाच आक्रंदल्या
वाऱ्याला उधाण आले
समुद्राची गाज क्षणभर थरकली
रस्ते रस्ताच विसरून गेले

त्या प्रचंड गतिमान चक्राच्या गतीने
गतीचे सारे नियम धाब्यावर बसवले
आणि नियतीचे चक्र ओलांडून
बंधमुक्त झालेल्या माणसांनी
जोराने बांग दिली
कधीच न येणारी रात्र ओलांडल्याची.

## ज्वाळांचे चाळ

मी चालतो खांद्यावर समुद्र घेऊन
तेव्हा यातनालयातून येणारी तान
माझ्या रस्त्यातच उभी राहाते
शरीरातील वीणेचा बाजा करणारी

कमरेत वाकून मोजीत
तिच्या भग्न पावलांचे रक्तावशेष
मी गाणे गातो
मी नाचू लागतो
हातातील कवड्या ताल धरतात
स्मशानात जमलेल्या प्रेतांच्या
ज्वाळांवर

या ज्वाळांचे चाळ
माझ्या पायात बांधून
प्रलंयकारी नर्तनातून
उभवीन मी नवी दुनिया
जेथे पाखरांच्या गीतांना मुक्त रान आहे.

## निग्रो, अस्पृश्य आणि बुराकूंसाठी

वडारणीच्या सरळसोट स्तनांप्रमाणं
आमच्या अस्तित्वावर टांगलेलं
वर्णविग्रहाचं गांडीव धनुष्य
'कलर्ड नॉट अलाऊड'च्या पाट्या
लिंचींग
आयाबहिणींशी जबरी संभोग
आणि तुमचं बळी जाणं
हे थेट आमच्यापर्यंत

आम्ही ज्या बेटावर रहातो
तेथे बारा महिने अंधार असतो
अंधार – खळाळ
समुद्राच्या गाजेसारखा
अंधाराचा आवाज.

थांब ! डरू नकोस
एक न् एक दिवस या अंधाराला
दिवस जाणारयत
अन् प्रसवणार एक उत्फुल्ल प्रभात
खळखळणाऱ्या भावनांची
लक्ष लक्ष जीवनांची :
माझ्या हातात त्याच्याचसाठी
विद्रोहाचा आसूड लखाखतोय

## लाल तांबडी नंबरी दिवे

रांडांच्या घरावरचे लाल तांबडी नंबरी दिवे
कुजबुजतात मिस्किलपणे
रस्त्यावरचा बोचरा असंतोष
दिसत नाही त्यांच्या कानांना

दूरवर निद्रानाशाचं दुःख भोगणारा
चौकातला ट्रॅफिकचा दिवाही
इकडं पाहिलं म्हणजे
डोळ्यावर कातडी ओढून घेतोय

झाडांचं मांसल लिंग
सळसळतंय ताठरतंय गोठतंय थबकतंय
चर्चच्या बेलचा इशारा त्याला सावधतोय
कान टवकारून पडलेलं कुत्रं
अंग झाडत पळत सुटतंय

गजरे नशा सेंट्स यांचा एकच आवाज
त्यांच्या कंठातून सूर्य साकारतोय
डोळ्यापुढं बांधलेली चेहऱ्यांची माळ....
कुठलंही कोकरू तयार आहे मान पुढे करून
भोगाची इस्त्री फिरवून घ्यायला
प्रत्येक जणीनं सवयलेली

घामाचे दाम टिपायला
प्रत्येक हात पसरट
प्रत्येकीच्या योनीवर एक रक्तलांछित कुंकू
ज्याची पडछाया प्रत्येक भोग्यावर

समोरचा रस्ता आता बडबडतोय
ट्रॅफिकच्या दिव्यालाही गाढ झोप आलेली दिसतेय
अंधार....अंधार....अंधार
प्रत्येक खोलीतून अंधार उगवत चाललाय.

## उत्पात

या अंधारवर्तुळाची पावले मोजताना
कितीकदा धाप लागते श्वास अडतो
कडकडते एखादी फासळीही केव्हा केव्हा

बाळांनो !
वाटते नाहीच सांगावी
ही अनंत गूढ–गुंतागुंत तुम्हाला
हीच माझ्या सोबतीला
एकाकी रात्री काळोख्या....उशाशी
खायला उठणाऱ्या आढ्याप्रमाणं
तरीही कुरवाळावीशी वाटणारी
बेशरम पाळीव कुत्र्याप्रमाणं

तुम्ही अजून असे
मोड आलेले कडधान्य
चुरमुऱ्या डोळयांनी जगाकडे पहाणारे....
मला वाटत नाही
उधळून टाकावे तुमचे जिणे
शापित योद्ध्याप्रमाणे
किंवा कणकण झिजणाऱ्या आणि
तरीही फुलणाऱ्या
मनुष्यभक्षी फुलाप्रमाणे

हे अपरिहार्य कोनाडे
गावठाणात वळवळलेले
निर्वासितांच्या प्रदेशांना
धरबंध नसतो
आणि तरीही एक कप्पा तुमचा
कारण ही जमीन
तशी कुणाच्याच मालकीची नाही

मी तुम्हाला बोट धरून चालवत नाही
: माझ्या राजांनो
पण ही गुहा दाखवावीच लागणार
मला तुम्हाला
अपरिहार्य वाटेतली

ह्या भयानक उत्पात पहाताना
डोळे मिटतो मी
आणि तरीही माझे कान ऐकत असतात
काळोखात
तुमच्या जहाजाची धून

## आम्ही जे जीवन जगतो

आम्ही जे जीवन जगतो
ते तुम्ही जगता तर—
( सुचल्या असत्या कविता मग ! )

भाकरीच्या तुकड्यासाठी म्हणून घेतो हाड ऽ हाड
तुम्ही मात्र न साहून निघून जाता ताड ताड

बोटभर पोट हातभर खळगी, भरता भरता जातो जीव
तुम्ही मात्र हात फिरवीत खुशाल म्हणता शिव, शिव

संस्कृतीचे कंत्राटदार म्हणून तुम्ही मिरवीत असता
आम्हा मात्र असंस्कृत म्हणून सदा हिणवीत असता

तुमच्या हाती नैवेद्याची सोनवाटी शोभत असते
आमच्या मात्र जातानाही कनवटीला कवडी नसते.

चंदनाच्या चितेवर निर्धास्त देह ठेवता
आम्हा मात्र मातीआड ढकलून तुम्ही मोकळे होता

हेच जीवन तुम्हा मिळते
तर सारे समजून येते.

## चे गव्हेरा

चे गव्हेरा,
तुझं अविनाशी अस्तित्वच
माझ्या सर्वांगात भिनलंय
क्युबा, फिडले कॅस्ट्रो, लॅटिन अमेरिका....
आमच्या धमन्याधमन्यांतून
तू एक गूढ रोमांचवादी काव्यमय अर्थ
आकाशाच्या निळ्या कॅनव्हासवर
बंदुकीचा बार भरताना
तुझा सृजनात्मा हुंकारतोय

हे चे, तू प्रक्रिया
कवीच न संपणारी.

## तुझ्यासाठी दोन अश्रू

तुझ्यासाठी दोन अश्रू....
एवढे पुरे आहेत....तुझ्यासाठी
मला होता येत नाही एवढं मोठं : अश्रूंएवढं
आणि अश्रूंशिवायही

अश्रू असतात सत्य ( असे म्हणतात )
मला ठाऊक नाहीत फसवे अश्रू
मी विश्वास ठेवतो अश्रूंवर
अश्रूला अश्रूंनी दाद देतो
: अश्रूंसाठी महायुद्ध पुकारतो
आणि कविताही

....तुझ्यासाठी दोन अश्रू
डोळाभर आणि नंतरही
एका अश्रूत दुनिया
दुसऱ्यात तू ( कदाचित मीच ‘ तू ’ समजून )
आता तुला विसरणेही मला सोपे जाईल.

## धरणी जळताना

धरणी जळताना दाहक उन्हात
का मेघाने गाळावे पाणी
सूर्य बुडताना रक्ताच्या डोहात
का उजेडाने मिटावी पापणी
का गवताने गहिवरावे दहिवरून
आकाशाच्या कपाळी विझताना चांदणी.

## तुम्ही जयभीम म्हणाल तर

तुम्ही जयभीम म्हणाल
तर त्यांचे तारवटलेले हात
तुमच्या जगण्याचाच खुर्दा करतील
दोस्त, तुफान असंच वाहतंय

पाहिलंत ना
समुद्राचं उधाण थोडं फिकंच पडेल
असं तुमचं दुःख
या कडेलोट भिंती
गजांच्या रांगा
आणि कैद्याच्या पेहरावात तुम्ही

जगायचेच झाले कधी
तर दातातून पाणी गळत
तर मसणाला हाडकी हाडवळी
तर एक कानतुटका कप
किंवा उष्ट्याला तवा
—आणि थोडं दुरूनच हो
या किरिनष्ट देशाला बाहेरवस झालाय

तुम्ही तसे सोशिकच
कसल्याच असतील कंबरा
नाहीतर बुद्धाच्या नाका-
हाताच्या कपच्या
गोंदल्याच असतील तुमच्या छातीवर....
आणि
त्याचा आकाशभक्षी टाहो
गरजला—तेव्हा
उभं खंडच थरारून उठलं.
असा गडगंज म्हातारा
पण त्याच्याही छातीला कंप फुटला !
बेइमान झाला बेटा....हे असं होतंच

तुमची बॅरीकेड ठरलेलीच तेव्हा
कोणती होती—
मिहिरकुलने वाहवलेल्या रक्तनद्या
आणि पुष्यमित्राचा उच्छेद
" श्रमणाचं डोकं कापून आणील
त्याला शंभर दिनार बक्षीस ! "
रक्तात उसळतोय लाव्हा
धमन्यांना फुटतायत ॲटम बॉम्बस

दोस्त, कूच अजून आहेच
क्षितिजावर पूर्ण सूर्य उगवून आलाय

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र.
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर

जिवंत असताना मला तुम्हाला
भेटता आले नाही बाबासाहेब
बरे झाले
तुमच्या उत्तुंग व्यक्तित्वाजवळ पोहोचणे
फारच अवघड होते म्हणतात
पोहोचलो अखेरचे पडत झडत
पण तुम्ही गेल्यानंतर
( बरे झाले : यावर प्रतिक्रिया नोंदवायला तुम्ही नाहीच )
कदाचित विझूनही गेलो असतो
तुमच्या झंझावातामुळे

बाबासाहेब, एक विचारू का ?
तुमच्या विचारांची कबर बांधणारे हात
तुमच्या पुतळ्याला पुष्पहार घालताना पाहून
तुम्हाला काय वाटते हो.
एकाचा बाबासाहेब
दुसऱ्याच्या बाबासाहेबांचे पाय ओढताना
दुसऱ्याचा बाबासाहेब
तिसऱ्याच्या बाबासाहेबांचे पाय ओढताना
तिसऱ्याचा बाबासाहेब
चवथ्याच्या बाबासाहेबांचे पाय ओढताना
आणि सगळेच मिळून बाबासाहेब

तुमचे हात–पाय–डोळे–कान–नाक ओढताना
तुम्हाला कसे होते हो ?

बाबासाहेब
तुमच्या नावाने हल्ली खूप मोठ्या जत्रा भरतात
( तुम्हाला बरे वाटते नाही )
आणि बरं का बाबासाहेब
तुमच्या नावाने ते मांडवदेखील घालतात
भले भले लोक येतात बाबासाहेब
तुमची उदंड उदंड स्तुती करतात
गुलाल खोबरे उधळतात

तुमचा माणूस एका दूरच्या बेटावर बसून
सगळे ऐकत असतो.
पानतंबाखू-धडप्यातली रोटी खात असतो
आणि पचापचा थुंकत असतो

बाबासाहेब का कुणास ठाऊक
असे झाले की मला
चतुर्थीचा गणपती आठवतो ?
गणपती बाप्पा मोरया
पुढच्या वर्षी लौकर या

तुम्हाला ठाऊक नसेल बाबासाहेब
तुमच्या नावाने जोगवा मागणेही सोपे जाते
( परडीत अत्याचाराची भरती होते )
बरं का बाबासाहेब
तुमचे पुत्र

मंत्री / संत्री / अधिकारी / काहीबाही / फार मोठे / मोठ्ठे झाले
पण त्यांच्या वाट्याला
कोतवालाचेच जिणे आले.
त्यांच्या शब्दांना तुमचाच वास असतो
पण का हो त्यांच्या तोंडाचाच वास येतो
( शब्दांचा वास चटकन् उडून जातो म्हणतात )
बाबासाहेब
तुम्ही काय केले असते हो
तुमच्यासमोर तुमची कबर बांधणाऱ्या
या मुडदेफरासांना
( बुद्धाच्या डोळ्यांनी तुम्ही त्यांच्याकडे पाहिले असते ? )
बरे झाले तुम्ही भेटला नाही बाबासाहेब
आता यायचेच झाले तर
प्रलय होऊन या
झंझावात होऊन या
अस्मान आणि धरती होऊन या....
सूर्याचे तेज, चंद्राची शितळाई, आदिवासीचे धनुष्य,
लोहाराचा हातोडा, गवंड्याचा दगड आणि
चांभाराची अरी होऊन या
आता यायचेच झाले तर असे या की
धरणीकंप होऊन नवा भूखंडच बाहेर येईल
एक युग होऊन क्रांती घेऊन या
अशा स्वरूपात तुमच्या भेटीसाठी
उध्वस्त होणेच मी स्वीकारेन बाबासाहेब,
स्वीकारेन बाबासाहेब.

## ' अरुण कृष्णाजी कांबळे ' या कवितासंग्रहाच्या निमित्ताने

कवितासंग्रहाला नाव देण्याच्या अनेक पद्धती असू शकतात. कुणी प्रतीकात्म नाव देतं, कुणी एखाद्या साध्या नावावर समाधान मानतो. पण माझे प्राध्यापक मित्र अरुण कांबळे यांनी आपल्या कवितासंग्रहाला ' अरुण कृष्णाजी कांबळे ' असं स्वतःचं नाव दिलं आहे. दलित कवी परंपरा नाकारून आपल्याला योग्य वाटेल अशा वाटेनं जातो त्याचं हे लक्षण असेल कदाचित.

दलित कवितेनं मराठी कवितेला आव्हान दिलं त्याला वीस-पंचवीस वर्षे झाली. पण मराठी कवितेच्या जडण-घडणीत ज्या मान्यवर कवींनी हातभार लावला त्यांनी या कवितेमागील प्रेरणा, या कवितेतून व्यक्त होणारा दाहक अनुभव, या कवितेची भाषा नीट समजावून घेतली आहे असे वाटत नाही. सामाजिक अन्यायाच्या, छळाच्या जखमांचे वण या स्तरातील कवींच्या मनावर आहेत हे ध्यानात घेतलं असतं तर या कवितेतील आक्रोशाची, विद्रोहाची, नकाराची अवहेलना झाली नसती. इतःपर आपण अन्याय सहन करणार नाही आणि आपण स्वातंत्र्य-समता आदि मूल्यांवर अधिष्ठित अशी नवी समाजव्यवस्था निर्माण करू अशी भूमिका घेऊन दलित कवी काव्यलेखन करीत आहेत. दलित कवींचं बंड येथील समाजव्यवस्थेविरुद्ध, विषमतेचा विचार पोसणाऱ्या मध्यम-वर्गीय साहित्याविरुद्ध, समाजाचे विघटन करीत राहिलेल्या जातिप्रथेविरुद्ध आहे.

दलित कवी म्हणजे एका वार्डाचे पेशंट वाटतात की जे एका सुरात रडतात असे एक विक्षिप्त मत स्वतःला बंडखोर समजणाऱ्या कवींने व्यक्त केले आहे. पण अशाच आंग्लाळलेल्या कवींनी स्वातंत्र्योत्तर कालखंडात नपुंसक पिढीचे तत्त्वज्ञान मांडणारा मेंटल वॉर्ड निर्माण केला आहे असे नाइलाजाने म्हणावे लागणार. दलित कविता मानवी मूल्यांशी बांधिलकी सांगणारी आहे. तिला 'बांधिलकी 'ची ॲलर्जी नाही. तिला आपले प्रश्न, आपले दुःख वेगळे आहे असं सांगण्याचा अधिकार आहे.

प्रा. अरुण कांबळे यांच्या कवितेतील मुख्य सूर विद्रोहाचा आहे. 'सतत संताप आणि शाप यांचा वर्षाव करीत राहिले तर साहित्य कंटाळवाणे होईल, एकसुरी होईल' असे प्रा. वसंत बापटांना वाटते. अभावग्रस्त समाजाच्या वाट्याला जे जीवन आले त्याचे मूळ येथील विषमतेच्या वल्ली पोसणाऱ्या समाजव्यवस्थेत आहे. ही किडलेली समाजव्यवस्था, सनातन संस्कृती हा या कवितेच्या संतापाचा विषय आहे. 'गद्दार' या कवितेत अरुण कांबळे म्हणतात—

अरे, यांनीच तुडवलंय बुद्धाच्या शिष्यांना
हत्तीच्या पायाखाली
यांनीच ठोकलंय येशूला क्रुसावर
गॉलगोथाच्या टेकडीवर
यांच्याच पित्यांनी मारलंय शंबूकाला
तपश्चर्या करताना
आणि मार्टिन ल्यूथर किंगलासुद्धा
हे सारे आमचे दावेदार

इतिहासाची साक्षच अशी आहे की मूल्यांसाठी झगडणाऱ्या विचारवंतांना, परिवर्तनवादी प्रवृत्तींना छळ सोसावा लागतो. पण विचार मरत नसतात. व्यक्ती काय, आज आहे उद्या नाही. पण तिनं मांडलेले तत्त्वज्ञान भावी पिढ्यांना प्रेरक ठरत असते. दलित कवींचे प्रेरणास्थान म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर बाबासाहेबांचे विचार घेऊनच दलितकवी जगत असतो. अरूण कांबळे म्हणतात—

जिवंत असताना मला तुम्हाला
भेटता आले नाही बाबासाहेब
बरे झाले
तुमच्या उत्तुंग व्यक्तित्वाजवळ पोहोचणे
फारच अवघड होते म्हणतात
पोहोचलो अखेरचे पडत झडत
पण तुम्ही गेल्यानंतर

आंबेडकरांच्या विचाराचा दिवा हाती घेऊन वाटचाल करणाऱ्या अरुण कांबळे यांच्यासारख्या संवेदनाशील तरुणाला दुःख होते, कारण बाबासाहेबांचे नाव घेत पुढारी स्वार्थ साधीत आहे. आपल्या अभावग्रस्त समाजाचे प्रश्न, त्यांची दुःखे, त्यांना सोसावा लागणारा अन्याय यांच्यासाठी लढा द्यायचा सोडून ही तथाकथित नेते मंडळी सत्तेच्या खेळात रंगली आहेत. ते सरळच विचारतात—

बाबासाहेब, एक विचारू का ?
तुमच्या विचारांची कबर बांधणारे हात
तुमच्या पुतळ्याला पुष्पहार घालताना पाहून
तुम्हाला काय वाटते हो ?

अनेक चिरफाळ्या उडालेला दलित वर्ग पुन्हा एकजुटीने आपल्या हक्कासाठी लढण्यासाठी उभा राहिला पाहिजे असे या तरुण मनाला वाटते. बाबासाहेबांचे क्रांतीचे तत्त्वज्ञान हा आपल्या जगण्याला आधार आहे. म्हणून ते म्हणतात—

आता यायचेच झाले तर असे या की
धरणीकंप होऊन नवा भूखंडच बाहेर येईल
एक युग होऊन क्रांती घेऊन या
अशा स्वरूपात तुमच्या भेटीसाठी
उध्वस्त होणेच मी स्वीकारेन बाबासाहेब

हिंदुधर्माविरुद्ध, या धर्माने निर्माण केलेल्या समाजव्यवस्थेविरुद्ध दलित कविता जशी आग ओकीत राहते त्याप्रमाणे स्वत्व विसरणाऱ्या, बाबासाहेबांच्या विचाराकडे दुर्लक्ष करणाऱ्या प्रवृत्तीविरुद्धही कांबळ्यांची कविता आग ओकीत राहते. 'माझा प्रत्येक शब्द आभाळ झालाय ' असा आत्मविश्वास व्यक्त करणारे कांबळे

आपला 'लहलहणारा जळजळीत लाव्हा'रसासारखा शब्द वर्णव्यवस्थेविरुद्ध, जातिप्रथेविरुद्ध, खुळचट धर्मकल्पनांविरुद्ध, अंधश्रद्धेविरुद्धही योजतात. शब्द हे तर त्यांचे शस्त्र! म्हणून त्यांची कविता धारदार तरवारीसारखी तळपते. आपल्या समाजाला आत्मभान आणून देणारी ही कविता विग्रह व विध्वंसाच्या वाटेने जाणारच. पण प्रा. वसंत बापट मात्र त्यांना उपदेश करतात की विग्रह आणि विध्वंस या वाटेऐवजी विवेक आणि विलीनीकरण या दुसऱ्याच पायरीकडे दलित साहित्यिकांनी आता वळावे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे मूळ प्रवाहाचा जोम वाढवल्यावर अतिरेक आणि धक्का–उपचार यांपेक्षा अधिक टिकाऊ प्रक्रियेचे महत्त्व आहे हेही कोणी नाकारणार नाही. पण दलित कवितेला एकाच वेळी विप्रमतेविरुद्ध लढतही राहावे लागणार व चिरंतन मूल्यांचा आग्रहही धरावा लागणार. दलित समाजावर इतक्या प्रचंड प्रमाणात अत्याचार होत आहेत की त्यामुळे दलित कवी आपल्या भावना प्रक्षोभक भाषेतच व्यक्त करणार! त्यांना आज तरी संयमाचा सल्ला देणे कितपत योग्य ठरेल? 'दलितांनो!' या कवितेत अरुण कांबळे म्हणतात—

पण वाटते कधी कधी
लावावी तुमच्या नपुंसक मनांनाच काडी
जी पहातात उघड्या डोळ्यांनी
आयाबहिणींचे नागडे देह
रस्त्यातून धिंड काढताना
आणि बलात्कार होत असताना

वस्तुतः दलितसमाज जे अन्याय, अत्याचार सोसतो त्याला या देशात न्याय मिळण्याची खात्री तरी वाटते का? म्हणून तो मूकपणे सोसतो आहे. अरुण कांबळे यांच्यासारख्या संवेदनाशील तरुणाला हे सोसवत नाही. त्याचा क्रोध कसा उफाळून येतो ते त्यांच्या कविता वाचताना सहज लक्षात येते. 'गद्दार' या कवितेत ते म्हणतात—

आज आम्ही गद्दार झालोय
तुमच्या संस्कृतीशी, ढोंगी मानवतेशी आणि
वांझ धर्माशी सुद्धा

कारण त्यांना एक नवी दिशा गवसली आहे. 'आज आम्हाला प्रकाशाचं शीड उभारलेलं स्वातंत्र्याचं गाव दिसतंय' असा एक आत्मविश्वास कांबळ्यांना वाटतो. मात्र त्यांना वाटतं की थंडपणे, मूकपणे जगण्यात अर्थ नाही. 'दलितांनो' या कवितेत ते लिहितात—

या बुणग्यांच्या जगात जगताना
जाळून घ्यावे वाटते
स्वतःला भर चौकात
निदान तुमची थंड शरीरे तरी तापतील
माझ्या देहाच्या शेकोटीजवळ
जमा होऊन बघताना

अरुण कांबळे यांच्यासारख्या कवीचा राग हा वाल्मीकिचा राग आहे. क्रौंच-मिथुनावर बाण सोडणाऱ्या व्याधाला शापित करणारा महाकवी वाल्मीकि अन्यायाविरुद्ध पेटून उठला. त्याचा राग दुर्वासासारखा स्वार्थी नव्हता. दलित कवींची वेदना तुमच्या आमच्या बधिर संवेदनशीलतेला जागवीत आहे. 'आम्ही जे जीवन जगतो' या कवितेत एक स्वर वेदनेचा आहे तर दुसरा विद्रोहाचा. आम्ही जे जीवन जगतो तेच जीवन तुम्हाला मिळते तर सारे समजून येते असे म्हणणारे कांबळे रोखठोक प्रश्न विचारतात—

संस्कृतीचे कंत्राटदार म्हणून तुम्ही मिरवीत असता
आम्हा मात्र असंस्कृत म्हणून सदा हिणवीत असता.

दलित कवितेतून व्यक्त होणारा विद्रोह आपण नीट समजावून घेतला पाहिजे. बी पेरण्याआधी जमीन भाजावी लागते. समतेचे बी पेरणारी दलित कविता विद्रोहाच्या रूपाने समाजमन भाजीत आहे. शिष्ट समाजाच्या सभ्यतेला धूप न घालता ही कविता शिव्याशाप स्वाभाविकच देणार. दांभिक समाजाच्या न्याय-नीतीचे वस्त्रहरण करताना उपहास आणि उपरोध यांचा सढळपणे उपयोग करणार नाही का ? 'मला जगात जगता येत नाही खोटी कातडी पांघरून' असं म्हणणारे अरुण कांबळे लिहिणारच की—

या ज्वाळांचे चाळ
माझ्या पायात बांधून
प्रलयंकारी नर्तनातून
उभवीन मी नवी दुनिया
जेथे पाखरांच्या गीतांना
मुक्त रान आहे.

कोणत्याही कालखंडात जे साहित्य जन्माला येतं ते त्या त्या कालखंडातील प्रभुत्व गाजवणाऱ्या सांस्कृतिक समूहाचं असतं. स्वातंत्र्यपूर्वकाळात सांस्कृतिक प्रभुत्व मध्यमवर्गाचं होतं म्हणून मराठी साहित्यात मध्यमवर्गीय जाणिवाच आविष्कृत झाल्या. स्वातंत्र्योत्तर काळात ज्यांचा आवाज आजवर दडपलेला त्यांचा आवाज उठला तेव्हा एक नवे वादळ घोंघावत आले. दलित साहित्याच्या रूपाने हे वादळ आले आणि मरगळलेले मराठी साहित्य हादरून गेले. दलित कवितेला जो विरोध होतो आहे तो पिढ्यान्‌पिढ्या सांस्कृतिक प्रभुत्व गाजवणाऱ्या समूहाकडून. म्हणून तर प्रा. बापट, गंगाधर गाडगीळ आणि त्यांचे समर्थक दलित कवितेतील प्रक्षोभाला फॅशनेबल प्रक्षोभ असं म्हणून हिणवीत असावेत. हा प्रक्षोभ फॅशनेबल असता तर तो केव्हाच कोलमडला असता. जो आजवर ' मूकनायक ' होता तो दलित साहित्यातून प्रक्षुब्ध नायक म्हणून आज वावरतो आहे. कविता ही केवळ एखाद्या भावनेचा आविष्कार नसते तर ती रसिकांच्या भावनेची चेतक असते. सामाजिक अन्यायाच्या आणि छळांच्या जखमा भळभळ वाहात आहेत अशा स्तरातील कवितेतून प्रक्षोभ उफाळत राहणार.

अरुण कांबळे यांची कविता परिवर्तनवादी विचाराला बांधील आहे. कोणताही वैचारिक प्रवास ' तटस्थ ' नसतो. त्याला एक भूमिका घ्यावी लागते व कोणतीही तडजोड न करता जगावेच लागते. अरुण कांबळे यांनीही एक भूमिका स्वीकारली आहे आणि तिचे दर्शन कवितेतून घडणे अपरिहार्य आहे.

**भालचन्द्र फडके**

पुणे विद्यापीठ
निरंतर व प्रौढ शिक्षण
आणि ज्ञानविस्तार विभाग

# स्वागत

प्रा. अरुण कांबळे म्हणजे दलित पँथरचा नेता, सम्यक आणि फर्डा वक्ता असाच त्याचा सर्वसामान्य परिचय आहे. पण या सर्वांच्या मुळाशी एका कविचं व्यक्तित्व लपलेलं आहे. अत्यंत संवेदनाक्षमता, विलक्षण हळवेपणा आणि कोणत्याही अनुभवाचा वा गोष्टीचा अधिकाधिक तटस्थपणे पण स्वतःच्याच शैलीनं, तर्ककठोरपणे बौद्धिक शोध घेणे हे अरुणच्या व्यक्तित्त्वाचे विशेष आहेत. गेल्या आठ-दहा वर्षांत आम्हा दोघांत विलक्षण जवळचं नातं निर्माण झालं. त्यामुळे त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे, विचारांचे विविध पैलू आणि त्यांचा विकास मला फार जवळून पाहता आला. दलितांच्या न्याय्य हक्कांसाठी, त्यांच्या आर्थिक, सामाजिक दास्यमुक्तीसाठी सहज संतापाने, विद्रोहाने व्यासपीठावर आवेशाने बोलणाऱ्या अरुणच्या डोळयांतून सहज हळवेपणाने स्रवलेले अश्रूही मी पाहिले आहेत. खरं तर अश्रू हेच त्यांच्या व्यक्तित्वाचं सार आहे. तो स्वतःच म्हणतो :

" मला होता येत नाही एवढं मोठं : अश्रूएवढं.
आणि अश्रूशिवायही. "

अश्रू हे केवळ निखळ व्यक्तिगतच नसतात, तर; त्यांच्या मुळाशी असते आर्थिक, सामाजिक व्यामिश्रता. ज्याच्यावर आर्थिक–सामाजिक परिस्थिती गुलामगिरी लादते, त्याचे अश्रू फसवे नसतात. उलट त्या अश्रूंत त्याला महायुद्ध पुकारण्याइतका विद्रोह सापडतो. तो म्हणतो :

" अश्रू असतात सत्य ( असे म्हणतात )
मला ठाऊक नाहीत फसवे अश्रू
मी विश्वास ठेवतो अश्रूवर
अश्रूला अश्रूंनी दाद देतो.
अश्रूसाठी महायुद्ध पुकारतो
आणि कविताही. "

म्हणून अश्रू हा असा त्याच्या कवितांचा मूलस्रोत नि मूलाधिष्ठानही आहे. त्याच्या व्यक्तित्वाचा हा अश्रू जर समजावून घेतला नाही तर त्याची कविताही समजणार नाही.

पारंपरिक मताप्रमाणे बुद्धाला रोगी, म्हातारा नि प्रेत दिसलं. आणि त्याला दुःखाची जाणीव झाली. या दुःखाचा मग बुद्धाने शोध घेतला. आणि अंतिम मुक्तीचा मार्ग दाखवला. त्याच्या दुःखमुक्तीच्या तत्त्वज्ञानाच्या मुळाशी विद्रोह होता. मानवी अश्रू हे दुःखाचं प्रतिक. हे दुःख टिपण्यासाठी हवी असते करुणा. ही करुणा अरुणचं व्यक्तित्व व्यापून टाकते. म्हणूनच त्याला अश्रूंना अश्रूंनीच दाद द्यावीशी वाटते. बुद्धाच्या या करुणेनेच तो अश्रूंचा, दुःखाचा शोध घेतो मग त्याला या अश्रूंच्या मुळाशी दडलेली आर्थिक, सामाजिक परिस्थितीची बीजं सापडतात. करुणेनं टिपलेले अश्रूच त्याला त्या परिस्थितीविरुद्ध बंड करण्यास प्रवृत्त करतात. करुणेनं दुःखाचा वेध घेणारा बुद्ध हा खरा विद्रोहक होता अरुणच्या विद्रोहात बुद्धाची ही करुणा आहे.

विद्रोह हा अरुणच्या कवितेचा नि व्यक्तिमत्वाचा प्राण आहे. चार्वाकविषयी त्याला विलक्षण ममत्व आहे हे ज्यांनी त्यांचे विचार ऐकलेत त्यांना माहीत असेल. पण चार्वाकाच्या विद्रोहात विलक्षण तर्ककठोरता असते. जे जे अतार्किक नि प्रत्यक्ष पुराव्याच्या विरुद्ध ते ते चार्वाक नाकारतात. बुद्धाच्या विद्रोहात चार्वाकांची तार्किकता प्रज्ञेच्या रूपात आढळते; पण त्याच वेळीं तिला करुणेचीही जोड असते. चार्वाकाच्या विद्रोहात सतत नि अनंत विद्रोहच सामावलेला असतो. पण बुद्धाच्या विद्रोहाच्या शेवटी स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या अटींवर आधारलेल्या समाजनिर्मितीचं स्वप्न असतं. अरुणला चार्वाकाविषयी ममत्व वाटतं; पण त्याचं रक्ताचं नातं आहे ते बुद्धाशी. म्हणूनच तो दुष्काळातल्या उपाशी म्हातारीच्या ( भगाटा ), मांग गारुडींच्या ( मांग गारुडी ), वेश्येच्या ( लाल लांबडी नंबरी दिवे ) दुःखाचा करुणेनं वेध घेतो. इथल्या समाजाशी, संस्कृतीशी पूर्ण गद्दार होतो. आर्थिक, सामाजिक क्रांतीसाठी गॉर्की, चे गव्हेरा, फिडेल कॅस्ट्रो यांची ध्येयं उराशी धरतो आणि शेवटी —

" या ज्वाळांचे चाळ
माझ्या पायात बांधून
प्रलंयकारी नर्तनातून

उभवीन मी नवी दुनिया
जिथं पांखराच्या गीतांना मुक्त रान आहे. ''

असं स्वप्न पाहतो. हे स्वप्न आहे स्वातंत्र्य, समता, बंधुत्व यांवर आधारित समाजनिर्मितीचं. जिथं पाखरांच्या गीतांना मुक्त रान आहे. म्हणूनच मी म्हटलं की त्यांचं चार्वाकापेक्षा बुद्धाशी अधिक जवळचं रक्ताचं नातं आहे. म्हणूनच त्यांच्या विद्रोहाचं स्वरूप विद्रोहाकरिता विद्रोह असं नसून अधिक सुजाण आणि विधायक असं आहे.

प्रज्ञा आणि करुणा हे बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचं मूलाधिष्ठान आहे. करुणेनं दुःख जाणावं, शोधावं आणि प्रज्ञेनं त्याचा वेध घ्यावा. अरुण स्वयंप्रज्ञेनं दुःखाचा कसा वेध घेतात ते पाहणं महत्त्वाचं आहे.

दलित पँथरच्या उदयानं दलित तरुणात विलक्षण चैतन्य निर्माण झालं होतं. तो आत्मशोध घेत होता. दलितांच्या आर्थिक, सामाजिक दास्यमुक्तीसाठी दलित चळवळीला आलेलं अपयश, इथल्या राजकीय चौकटीत सतत बहुमताचं राजकारण करावं लागत असल्यामुळं, शासनाचं व शासनकर्त्या राजकीय पक्षांचं दलिताकडं होत असणारं दुर्लक्ष, यामुळे स्वहक्काविषयी अधिक जागृत झालेला तरुण, उद्वेगग्रस्त झाला. त्याला अन्याय, अत्याचाराविरुद्ध लढावासं वाटत होतं. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाला लोकशाही घटना दिली, बाबासाहेबांनी लोकशाहीला अधिक महत्त्व दिलं, म्हणून दलित तरुणांनाही लोकशाहीविषयी ममत्व वाटत होतं. पण हीच लोकशाही दलितांचे प्रश्नही सोडवत नाही याची रुखरुखही वाटत होती. त्यामुळेच

" हाण सख्या तुझीच बारी
लोकशाही मेली तर डेंगण्या मारी ''

ही नामदेव ढसाळ यांच्या कवितेची ओळ दलित पँथरच्या मोर्च्यातली घोषणा झाली होती. पण तरीही दलित तरुणाला स्वमुक्तीचा खरा मार्ग व हत्यार सापडत नव्हतं. त्याचा विद्रोह भावनिक होता. यामुळे दलित साहित्यात प्रचंड भावनिक विद्रोही कविता निर्माण झाली. तिच्यात फक्त विद्रोह आणि विद्रोहच होता. त्यामुळे काहींना ती एकसूरी वाटली.

अरुण त्या वेळी सांगलीत दलित पँथरचा सक्रिय कार्यकर्ता होता. दलित पँथरनं त्या वेळी सर्व समाजाला ढवळून काढलं होतं. विद्रोहाच्या तीव्र जाणिवेमुळं

दलित कविता समूहासाठी, त्यांना आवाहन करण्यासाठी, शत्रूंना आव्हान देण्यासाठी अवतरत होती. त्यामुळे तिचा बहुतांश सूर निवेदनात्मक, वक्तृत्वात्मक होता. याचा अपरिहार्यपणे परिणाम अरुणच्या कवितेवरही होत होता. या दृष्टीने ' गद्दार ' व ' दलितांनो ', ' आम्ही जे जीवन जगतो ' या कवितांकडे पाहता येईल. या तिन्ही कविता समूहांसाठी आहेत.

पण अरुणच्या कवितांचा हा पिंड नव्हताच मुळी. तो त्या वेळच्या दलित चळवळीचा तीक्ष्ण परिणाम होता. अरुणच्या कवितेचा खरा पिंड होता आत्मशोधनाचा आणि हा आत्मशोध तो प्रज्ञेच्या साहाय्याने कसा घेतो हे पाहणे उद्‌बोधक आहे.

वर सांगितल्याप्रमाणे दलित पँथरची चळवळ ऐन भरात असताना दलित तरुण भांबावलेला होता. तो विद्रोही होता, पण दलितांचे प्रश्न सोडवण्याचे मार्ग व हत्यार त्याला सापडत नव्हते. या वेळी अरुण होता २१ वर्षे ९ महिने ९ दिवसांचा ( जंगल ). या कवितेत तो स्वतःचा शोध घेतोय. आर्थिक-सामाजिक परिस्थितीत, नव्हे जंगलात तो कोंडला गेलाय. या जंगलाचा तो वेध घेतोय. विद्रोहाच्या प्रचंड जाणिवेने तो शहारलाय. पण ही विद्रोहाची जाणीव आत्मशोधनातून निथळपणे अवतरते.

" या झाडीच्या पल्याडातून
एक सांद्र निथळ घंटा
शरीरभर वहातेय
जिचे अस्तित्व अनादि अनंत. "

पण या आत्मशोधनातून जंगलाचा ठाव मात्र लागत नाही.

" मी आल्यापासून पहातोय
अगम्य शिलालेखांची प्रचंड वलये
आणि हे निर्वासित जंगल
ज्याचा मागमूस मला ठाऊक नाही. "

या प्रचंड जंगलातून सुटण्यासाठी तो वाट शोधतोय पण, ती सापडत नाही. तो आतून गुदमरतोय, तडफडतोय. पण त्याला सतत जाणवत राहतं की—

" या प्रचंड वज्रकाय झाडीत
मला कोंडून घातलंय. "

जंगलात आपणाला कोणीतरी कोंडून घातलंय ही जाणीव होणं हे सुद्धा विद्रोहाचं लक्षण. ह्या विद्रोह आला आहे आत्मशोधातून म्हणून. तो आक्रस्ताळी, भडक नाही. इथंच अरुणच्या कवितेला स्वतःचा सूर सापडला.

अरुणच्या कवितेला स्वतःला सूर सापडला खरा, पण आत्मशोधनाच्या मार्गाने ती अधिक गंभीर व चिंतनशील होऊ लागली. स्वतःला आयन्याच्या समोर उभा करून तो स्वतःलाच न्याहळू लागला. पण रूप मात्र स्वतःचं नाही तर संपूर्ण समाजाचं दिसत होतं. तो म्हणतो :

" ऐनेमहालात उभे रहावे स्वतःच्याच
डोळे झळाळणाऱ्या
अंधारगुहांचे प्रदेश न्याहाळावेत स्वतःच
गुहाखोल डोळ्यांनी
काळोखपुत्र होऊन
आणि जुळवावेत संदर्भ
एका पुरावास्तवाचे अवशेष आपणही म्हणून. "

पुरावास्तवाचे अवशेष एका व्यक्तीचे व्यक्ती म्हणून नसतातच मुळी. ते असतात संस्कृतीचे, संपूर्ण समाजाचे प्रतिनिधी. म्हणून या संस्कृतीला व समाजाला तो अंधारगुहांचे प्रदेश म्हणतो. ही गुहा अंधारी आहे. पण ही गुहा आहे तरी कशी ? तर हिरोशिमासारखी. अमेरिकेने हिरोशिमावर बॉंब टाकून ते बेचिराख केले. इथे बॉंब टाकलेत ते याच देशाच्या संस्कृतीनं आपल्याच माणसांवर. त्यांना अस्पृश्य करून, त्यांच्यावर गुलामीचे जिणं लादून. तो म्हणतो—

" हजारो हिरोशिमा सरपटतायत माझ्यातून
आदिम अवस्थेपासून माझ्या इंद्रियातूनच
तुटलियत शहरं
माझीच कलेवरं तमाम रांगांतून
फुटलेल्या रक्तगाठींच्या लोंढ्याच्या पुरात
माझाच होतोय खुर्दा. "

मग स्वतःचेच पुरावास्तवाचे अवशेष आपणहून जुळून येतात. आपलं स्वतःचं म्हणून पर्यायाने आपल्या दलित समाजाचं स्पष्ट रूप त्याला सापडतं. पणव

स्वतःचा खुर्दा होत असल्याबद्दल तो जितका जागरूक आहे तितका त्याला त्याचा समाज जागरूक आहे असं वाटत नाही. अशा समाजाला तो प्रक्षुब्ध होऊन शिव्याही देतो.

" चारचौघांकडे बघून जगताना
जाळू नये वाटतात तुमची भ्याड
प्रेतेदेखील. "

पण हा प्रक्षुब्धपणा निवळतो. तो शांतपणे त्याचा विचार करू लागतो. दुःखमुक्तीची, दास्यमुक्तीची स्वप्ने आपल्या बापजाद्यांना पडतच नाहीत की काय असं त्याला वाटू लागतं. मग त्याला त्यांच्यात राहूनही परकं वाटू लागतं.

" आणि तुमच्यापासून खूप दूर मी
तुमची स्वप्नेही पोहोचत नाहीत तिथं
तुमच्यापासून कितीक योजने दूर
आणि कितीक जवळ. "

असं अरुणला का वाटतं ? अरुण म्हणजे धर्मांतरानंतरची दुसरी पिढी. इथपर्यंत महात्मा फुले ते डॉ. आंबेडकर यांनी समाजाला दुःखमुक्तीची जाणीव दिली होती. बौद्ध समाज तर आंबेडकरमयच झाला होता. त्यांना हवा असणारा विद्रोह तर समाजात वसत होताच. मग तो व त्याचा समाज यांत असा अंतराय का पडतो ?

दलित पँथरचा उदय झाला तेव्हा स्वातंत्र्य मिळून वीस-बावीस वर्षे उलटून गेली होती, तरीही दलितांची दास्यमुक्ती होत नव्हती. दर दिवस अन्याय-अत्याचाराच्या बातम्या येत होत्या. दलित तरुण प्रक्षुब्ध होत होता. मोर्चे-निदर्शने होत होती. तरीही अन्याय-अत्याचारांत खंड पडत नव्हता. मग एकच मार्ग उरतो : या समाजाची नवी जडणघडण करण्याचा. सनदशीर मार्गावरचा विश्वास उडालेला असतो. उरतो सशस्त्र लढ्याचा. त्या वेळी पँथर्सच्या डोक्यात हे वेड उतरलं होतं. नामदेव ढसाळ तर माओ, लेनिन, मार्क्स, चे गव्हेरा उद्धृत करीत होते. अरुणलाही सशस्त्र क्रांतीने होणारा समाजबदल हवासा वाटू लागला होता. तो गॉर्कीला शोधू लागला होता.

" रोज माझ्या स्वप्नात गॉर्की येतोय
तंग फ्रॉक कोट चढवून

त्याच्या बुटक्या पोलादी दमदार सरदारासह
ज्याच्या कर्तृत्वाला लाली होती
जिभेवर घोळणाऱ्या ' र 'त गती होती क्रांतीची
अन् मुठीत गुलाल होता उत्साहाचा. "

अरुणची स्वप्ने होती ' क्युबा, फिडेल कॅस्ट्रो, लॅटिन अमेरिका— आणि चे गव्हेरा.' क्युबा, चिली, आणि लॅटिन अमेरिकेतले देश यांवर अमेरिकन साम्राज्यशाहीचा वरवंटा फिरत होता. पण चे गव्हेरा व फिडेल कॅस्ट्रो यांनी अमेरिकन साम्राज्यवाद हाणून पाडला आणि आपल्या देशाला व बांधवांना दुःखमुक्त केलं. पण इथं असं का घडत नाही ? त्याच्या चिंतनातला हाच मोठ प्रश्न. त्याला न सुटणारा. तरीपण त्याचं तारुण्यसुलभ मन सर्वंकष क्रांतीकडं धाव घेतं. अशा क्रांतींचं गॉर्की–चे गव्हेरा त्याला प्रतिक वाटतं.

" हे चे, तू प्रक्रिया
कधीच न संपणारी. "

सर्वंकष बदलाची, विद्रोहाची कधीच न संपणारी प्रक्रिया म्हणजे चे. पण आपल्या देशाविषयी काय ? विद्रोह आहे, पण क्युबा–चिलीसारखी क्रांती नाही. त्याला शोधावा लागतो गॉर्की.

" ती सावरलेली लाल कडा त्यांचं स्वागत करतेय —
मी उसासतोय.
गॉर्की—गॉर्की—गॉर्की—
माझा गॉर्की कुठाय ? "

हा गॉर्की तर सापडतचं नाही. क्युबा–चिलीसारखा हा समाज बदलत नाही. मग अपरिहार्यपणे त्याच्यात व समाजात, त्याच्या बापजाद्यात अंतराय निर्माण होतो.

" आणि तुमच्यापासून खूप दूर मी
तुमची स्वप्नेही पोहोचत नाहीत तिथं
तुमच्यापासून कितीक योजने दूर
आणि कितीक जवळ "

चे गव्हेरा, फिडेल कॅस्ट्रो यांना रक्तलांच्छित क्रांतीचं वावडं नाही. ते खंदे कम्युनिस्ट. आता अरुणचे विचार साम्यवादी नाहीत. तो अनेक वेळा बोलला

आहे की, समाजक्रांतीसाठी हजारो लोकांची डोकी छाटणे मला मान्य नाही. मग त्याला चे गव्हेरा नि कॅस्ट्रो आदर्श वा जवळचा का वाटतो ? सामाजिक बदलाचं प्रतिक म्हणून चे व कॅस्ट्रो त्याच्या कवितेत येतो असं त्याचं स्पष्टीकरण केलं जाईल. निखळ कवितेच्या अंगाने ते रास्तही आहे, पण पुरेसं नाही. पँथरच्या ऐन उमेदीत, कोणत्याही मार्गाने सामाजिक बदल झाला पाहिजे अशी दलित तरुणांची जी उत्कट विद्रोही भावना होती तिचं ते रूप आहे. अरुण त्या भावनेपासून मुक्त नव्हता. म्हणूनच तो गॉर्कीला शोधतो.

पण आस्ते आस्ते या भावनाकल्लोळातून तो मुक्त होत गेला. विचारांची पक्की आणि ठाम भूमिका बनत गेली. तरीपण अन्याय-अत्याचाराला बळी पडलेला क्रांतिहीन समाज आणि त्याविरुद्ध प्रखर विद्रोह करणारा तो यांच्यातली दरी बुजली नाही. आपण म्हणजे कोण ? अन्याय-अत्याचाराला बळी पडून उमटलेली समाजाची वेदना की तिच्या विरुद्ध विद्रोह करणारी प्रकाशशलाका ?

" एक दिगंत वेदनाच होऊन आपण
व्यक्त होतो चिरकालाची
की एकाकी प्रकाशशलाका
अंधाराच्या गाभ्याला चिरत जाणारी "

अरुण दिगंत वेदना होणं शक्यच नाही. त्याचा खरा पिंड आहे तो एखादी का होईना अंधाराच्या गाभ्याला चिरत जाणाऱ्या प्रकाशशलाकेचा. म्हणजे विद्रोहाचा. पण हा विद्रोह कुठपर्यंत ? त्याला अंत आहे की नाही ? चार्वाकाच्या विद्रोहात विद्रोहाला अंत नसतो आणि अरुणला चार्वाकाविषयी ममत्व आहे. पण अंतिम स्वप्न काय ? तर जिथं पाखरांच्या गीतांना मुक्त रान आहे असा समाज निर्माण करण्याचं. म्हणजे बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचं. आणि बुद्धाशी त्याचं रक्ताचं नातं. मग त्याला बुद्धाकडं पोचायचं आहे चार्वाकाच्या सहाय्याने. आणि बुद्ध आणि चार्वाक यांच्यात भलामोठा समुद्र. बुद्ध तर दूर दूर किनारी आणि मधे तो स्वतः, आपण.

" खरं म्हणजे
एका टोकापासून दुसऱ्या अज्ञात टोकापर्यंत
सुरू असलेल्या प्रवासातील

एक टिंबांकित बेट
आपण. ”

अरुणच्या दृढ होत गेलेल्या विचाराचं हे सार आहे. म्हणून याचं विस्तृतपणे विश्लेषण व विवेचन करणं महत्त्वाचं वाटतं.

विद्रोह हा त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा प्राण आहे. पण सतत विद्रोह त्याला मानवणारा नाही. कधीतरी स्वातंत्र्य, समता व बंधुत्व यवांर आधारित समाज निर्माण केलाच पाहिजे हे त्याचं स्वप्न आहे. या स्वप्नापर्यंत पोचण्यासाठी सुरू असलेल्या प्रवासात अनेक अडथळे, प्रश्न, उपप्रश्न निर्माण होतात आणि काळाबरोबर प्रश्नाचं स्वरूपही बदलतं. नवे प्रश्नही निर्माण होतात. मग जुने विचार, तत्त्वज्ञान अपुरे पडू लागते. नव्या प्रश्नासाठी नवं तत्त्वज्ञान, नवे मार्ग यांची आवश्यकता वाटू लागते. हा प्रवास सतत, अज्ञात टोकापर्यंत. निश्चित ध्येयाच्या स्थळी आपण कधी पोहचू हे माहीत नाही. मग उरतो आपण फक्त टिंबाकिंत बेट.

अरुणच्या विचारात सापेक्षतावाद व आधुनिक राजकीय तत्त्वज्ञानाच्या मुळाशी असणारा उत्क्रांतिवाद दडलेला आहे. वर उद्‌धृत केलेल्या कवितेत कोणाला कदाचित निराशावाद वा शून्यवाद जाणवेल. पण तसा त्यात नाही. या कवितेतील ‘ सुरू असलेल्या प्रवासातील ’ ही ओळ महत्त्वाची आहे. ती चालू वर्तमान काळात आहे. ‘ अज्ञात टोकापर्यंत ’ पोहचेपर्यंत प्रवास सतत सुरूच रहाणार आहे. म्हणजेच सतत विद्रोह आणि सतत विद्रोह. हे निराशवादाचे वा शून्यवादाचे लक्षण नव्हेच मुळी.

याच संदर्भात त्याची ‘ उत्पात ’ ही कविता पाहता येईल. ही क वता त्याने त्याच्या विद्यार्थ्यांना उद्देशून लिहिली आहे. इथं त्याची वैचारिक दिशा अतिशय सुस्पष्ट झालेली आहे. त्याची भूमिका व तत्त्वज्ञान स्पष्टपणे सापडले आहे. म्हणून तो आत्मविश्वासपूर्वक नि शिक्षकाच्या अधिकाराने म्हणतो,

“ मी तुम्हाला बोट धरून चालवत नाही
माझ्या राजांनो
पण ही गुहा दाखवावीच लागणार
मला तुम्हाला
अपरिहार्य वाटेतली. ”

इथं गुहा निराशवादाचं प्रतिक नाही तर अनंत प्रश्न, समस्या, दुःख यांचं प्रतिक म्हणून येते. हे दुःख आर्थिक-सामाजिक बदलाच्या बरोबर बदलत जाणार आहे. पण ते दुःख व प्रश्न असणारच व ते त्याला अपरिहार्यच वाटतं. पण—

" मला वाटत नाही
उधळून टाकावे तुमचे जिणे
शापित योद्धयाप्रमाणे "

असेही तो म्हणतो. म्हणजे या दुःखाला सामोरे गेलेच पाहिजे. त्याविरुद्ध लढलेच पाहिजे. त्यात उत्पात होईल, पण शेवटी विजय आपलाच आहे हे तो सूचकपणे सांगतोय.

" हा भयानक उत्पात पाहाताना
डोळे मिटतो मी
आणि तरीही माझे कान ऐकत असतात
काळोखात
तुमच्या जहाजाची धून."

विजयाविषयी तो आशावादी आहे. पण निर्णायक युद्धासाठी अंतिम पूर्ण विजय प्राप्त करणे त्याला मानवणारे नाही. कारण एका विजयात त्याला पुढच्या युद्धाची बीजं दिसतात. जुन्या परंपरेला, जुन्या व्यवस्थेला नकार दिल्यानंतर, नवी न्यायी, मानवमुक्तीची समाजव्यवस्था निर्माण करताना, अंतिम मूल्यांना छेद देणाऱ्या समाजप्रवृत्ती निर्माण होतच असतात. म्हणूनच एका विद्रोहात दुसऱ्या विद्रोहाची बीजं त्याला दिसतात. जे नवं निर्माण केलं तेच हळूहळू जुनं होऊ लागतं. जो प्रकाश वाटत होता तोच हळूहळू अंधार होऊ लागतो. मग नवं-जुनं, प्रकाश-अंधार असं द्वंद्व सतत चालू राहातं. या द्वंद्वात तो टिंबांकित बेटाप्रमाणे राहतो. सतत संघर्ष करीत. हा प्रवास कधी सुरू झाला व कधी संपणार माहीतच नसतं. मग अपरिहार्यपणे वर्तमानकाळाला भूतकाळाची आवर्तनं वेढतात. मग भूतकाळाची सावली घेऊन, वर्तमानकाळाचं बोट धरून, भविष्यकाळाकडं चालत राहावं लागतं. हा प्रवास कोणत्या पिढीपासून कोणत्या पिढीपर्यंत माहीत नसतो. आपण फक्त नवं–जुनं, तेज व अंधार असं द्वंद्व घेऊन चालत राहायचं.

" कोणत्या पिढीपासून
कोणत्या पिढीपर्यंत हा प्रवास
नि मी हा असा
सगळ्यांचं तेज आणि अंधार साठवून."

हे द्वंद्व सनातन आहे. आदिम आहे. हे तो स्वतःच्या प्रेमानुभवातून मांडतो. प्रेम तसं म्हटलं तर किती व्यक्तिगत आणि तरीही सामाजिक. प्रेयसी ही उत्खननातील सांगाड्याशी—परंपरेशी इमान राखणारी आणि त्या परंपरा तोडणारा तो. ती हवीही आहे. तरीपण ती त्याच्यापासून दूर आहे. ती रक्तात आहे. पण ट्यूमरसारखी पिडतही आहे. ती आदिम परंपरेतली आहे तरी तिला विषकन्या म्हणावंसं त्याला वाटत नाही. विषकन्या! तिच्यावर आयुष्य उधळून द्यायचं नि तिचा भोग घेतल्यावर तिचं विष आपल्या शरीरात भिनायचं. पण ती त्याला विषकन्या वाटत नाही. उलट तिला सूर्यफूल घेऊन सूर्योन्मुख फिरण्याचं आवाहन तो करतो. कारण तिच्याच पोटी त्याला नवा सृजनात्मक अंकूर दिसतो.

" का कुणास ठाऊक पोरी
मला तुझ्यात हजारो वर्षांच्या उत्खननात सापडलेला
जुनापुराणा सांगाडा दिसतोय
सृजनाच्या प्रक्रियेला वरदहस्त देणारा
विश्वाचा आदिबंध
तुझ्या रूपानं साकारतोय."

इथं मग प्रेयसी प्रेयसी राहत नाही. स्त्री स्त्री राहत नाही. ती नवसृजनात्मक आदिमशक्ती बनते. त्याच्या भावविश्वाचं ती बलस्थान बनते. आणि विचार भावनांची रूपं घेऊन येतात नि भावना विचारांची. आणि ती शब्दांतून अतिशय संयतपणे साकार होतात.

अरुणच्या कवितेतील हा मूलबंध लक्षात घेतला तर ती पैलू पाडलेल्या हिऱ्यासारखी चमकू लागते. तशी ही कविता सरळ, साधी, सोपी, अनुभवाला सरळ भिडणारी. पण ती प्रत्यक्ष अनुभापेक्षा त्याच्या अर्थाला टिपते. अनुभवाभोवती निर्माण होणाऱ्या भावभावना, विचार यांचा वेध घेते. कोणतीही कवितिक वळणं घेत नाही. प्रतिमांची जंगलं निर्माण न करता सरळपणे अनुभवाला साकार करते. हा अनुभव जितका आत्मनिष्ठ तितकाच वस्तुनिष्ठ आहे. खरं तर निसर्ग

व सजीव सृष्टीच्या सान्निध्याशिवाय अनुभवाला पूर्णत्व येतच नसतं. भौतिकतेच्या क्रियाप्रतिक्रिया मनावर उमटत रहातात.

अरुणची कविता जितक्या सरळपणे अनुभव टिपते तितक्याच सरळपणे ती अर्थही दृग्गोचर करतेच असे नाही. किंबहुना अनुभवानुषंगिक सरळपणे तो साकारतच नाही. तो वेगळं वळण घेतो. हे वळण त्याच्या वैचारिक मूलबंधा-शिवाय समजणं अशक्य. यासाठी त्याची ' डॉ. आंबेडकर ' ही हल्लीच लिहिलेली कविता उदाहरणादाखल घेऊ. तीत त्याच्या वैचारिक मूलबंधाची कवितेवर अजून-सुद्धा किती पकड आहे हे लक्षात येईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांत विद्रोह निर्माण केला. त्यांना नव्या समाजाचं स्वप्न दिलं. पण त्यांच्यानंतर समाजात गोंधळ माजला. आंबेडकरी तत्त्वज्ञानाला विकृती आली. नेतेगण प्रतिबाबासाहेब होऊ लागले, पण नवसमाज निर्माण करण्याची बाबासाहेबांची शक्ती त्यांच्यात नव्हती. त्यांच्या विद्रोहालाच श्रद्धेचं रूप आलं. आंबेडकर जयंतीला गणेशोत्सवाचं रूप आलं. अशा गदारोळात आंबेडकराचं तत्त्वज्ञान, त्यांचं ध्येय, स्वप्न बाजूला पडू लागलं. अरुण हे सगळे उपरोधिकपणे टिपतो. पण शेवटी बाबासाहेबांनी प्रलय होऊन यावे, ही विकृती नष्ट करावी, असं त्याला वाटतं. या प्रलयात स्वतःच उद्ध्वस्त होणेही तो पत्करतो.

असा तो साधा सरळ सोपा अनुभव कवितेतून मांडतो. पण याच अनुभवाला त्याच्या वैचारिक मूलबंधाची मात्रा लागू केली तर त्यातून वेगळंच पण त्याचं आवडतं तत्त्वज्ञान साकार होऊ लागतं.

डॉ. आंबेडकर म्हणजे विद्रोहाचं प्रतिक. जुन्या परंपरेला, श्रद्धेला, व्यवस्थेला त्यांनी नकार दिला आणि नव्या व्यवस्थेची मांडणी केली. पण अरुणच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे नव्यात जुन्याचा अंश असतोच. विजयात पुन्हा युद्धाची बीजं असतात. कारण नवनव्या समस्या, नवे प्रश्न निर्माण करतात. यासाठी पुन्हा नव्या मार्गाची, नव्या तत्त्वज्ञानाची आवश्यकता असते. बाबासाहेबांनी जुनं नाकारून नवं निर्माण केलं. पण आता त्या नव्यातही विकृती निर्माण झाली. नवे प्रश्न निर्माण झाले. यासाठी त्याला बाबासाहेबांनी पुन्हा यावंसं वाटतं. तेही प्रलय होऊन. प्रलयात सगळंच नष्ट होतं. मग नंतर नवं उभारावं लागतं. तो बाबासाहेबांना बोलावतो ते, जे नवं होतं ते जुनं होऊ लागलं म्हणून. त्यात तो

स्वतःही उद्ध्वस्त होणं स्वीकारतो. कारण या उद्ध्वस्ततेत नव्याचाच अंकुर उगवणार याची त्याला खात्री असते. मग बाबासाहेब ही व्यक्ती म्हणून राहत नाही; तर विद्रोहाचं व नवनिर्मितीचं प्रतिक बनतं. जुन्याचा नाश व नव्याचा उदय याचं चिन्ह बनतं. म्हणून त्याचा वैचारिक मूलबंध कविताला लागू केला की साधी सोपी वाटणारी, सरळपणे अनुभव व्यक्त करणारी कविता वेगळ्याच विचारविश्वाकडं व भावविश्वाकडं वळण घेते. या मूलबंधाभोवती अजून तरी त्याची कविता फिरते. उद्याच्या विकासात ती कोणतं रूप घेईल कुणास ठाऊक.

१९७० ते १९८३ या तेरा वर्षातील एकूण २९ निवडक कविता या संग्रहात समाविष्ट केलेल्या आहेत.

खरं तर अरुणचा संग्रह ७४–७५ सालीच यावयास हवा होता.

या कवितेने आपल्या भाषिक, प्रादेशिक सीमा कधीच ओलांडल्या होत्या. १९७३ साली Times Weekly मध्ये या कवितांची भाषांतरे आली आणि त्यांनी लक्ष वेधून घेतले.

लागोपाठ १९७४ मध्ये 'Seminar' मध्ये आणि 'Bulletin for Concerned Asian Scholars' या अमेरिकन नियतकालिकात ती भाषांतरित झाली प्रीतीश नंदी या बंगाली कवीने संपादित केलेल्या Modern Indian Poetry या सर्व भारतीय भाषांतील ६० निवडक कवींच्या कविता संग्रहात नामदेव ढसाळ व अरुण कांबळे या दोन दलित कवींनी स्थान पटकावले.

दलित कवितेपैकी या दोघांच्याच कविता नंदींनी या संग्रहात समाविष्ट केल्या आहेत ही गोष्ट बरीच सूचक आहे.

मायनॉरिटी राइट्स ग्रुप, लंडन यांनी भारतीय दलितांच्या दुःखाला वाचा फोडण्यासाठी युनोला सादर केलेल्या Untouchables या निबंधवजा निवेदनातही दलितांच्या जाणिवेची प्रतिनिधी म्हणून अरुणची कविता समाविष्ट केली गेली तर जपानी, हिंदी, गुजराथी अशा भिन्न भाषांत ती भाषांतरित केली गेली.

अशा या कवीच्या निवडक कविता आता संग्रहरूपाने एकत्रित वाचावयास मिळत आहेत.

मी त्यांचे स्वागत करतो.

— सुधाकर शि. गायकवाड

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२८९१
काव्य २८००१
१४।७।८३

स्वतःही उद्ध्वस्त होणं स्वीकारतो. कारण या उद्ध्वस्ततेत नव्याचाच अंकूर उगवणार याची त्याला खात्री असते. मग बाबासाहेब ही व्यक्ती म्हणून राहत नाही; तर विद्रोहाचं व नवनिर्मितीचं प्रतिक बनतं. जुन्याचा नाश व नव्याचा उदय याचं चिन्ह बनतं. म्हणून त्याचा वैचारिक मूलबंध कविताला लागू केला की साधी सोपी वाटणारी, सरळपणे अनुभव व्यक्त करणारी कविता वेगळयाच विचारविश्वाकडं व भावविश्वाकडं वळण घेते. या मूलबंधाभोवती अजून तरी त्याची कविता फिरते. उद्याच्या विकासात ती कोणतं रूप घेईल कुणास ठाऊक.

१९७० ते १९८३ या तेरा वर्षांतील एकूण २९ निवडक कविता या संग्रहात समाविष्ट केलेल्या आहेत.

खरं तर अरुणचा संग्रह ७४–७५ सालीच यावयास हवा होता.

या कवितेने आपल्या भाषिक, प्रादेशिक सीमा कधीच ओलांडल्या होत्या. १९७३ साली Times Weekly मध्ये या कवितांची भाषांतरे आली आणि त्यांनी लक्ष वेधून घेतले.

लागोपाठ १९७४ मध्ये 'Seminar' मध्ये आणि 'Bulletin for Concerned Asian Scholars' या अमेरिकन नियतकालिकात ती भाषांतरित झाली प्रीतीश नंदी या बंगाली कवीने संपादित केलेल्या Modern Indian Poetry या सर्व भारतीय भाषांतील ६० निवडक कवींच्या कविता संग्रहात नामदेव ढसाळ व अरुण कांबळे या दोन दलित कवींनी स्थान पटकावले.

दलित कवितेपैकी या दोघांच्याच कविता नंदींनी या संग्रहात समाविष्ट केल्या आहेत ही गोष्ट बरीच सूचक आहे.

मायनॉरिटी राइट्स ग्रुप, लंडन यांनी भारतीय दलितांच्या दुःखाला वाचा फोडण्यासाठी युनोला सादर केलेल्या Untouchables या निबंधवजा निवेदनातही दलितांच्या जाणिवेची प्रतिनिधी म्हणून अरुणची कविता समाविष्ट केली गेली तर जपानी, हिंदी, गुजराथी अशा भिन्न भाषांत ती भाषांतरित केली गेली.

अशा या कवीच्या निवडक कविता आता संग्रहरूपाने एकत्रित वाचावयास मिळत आहेत.

मी त्यांचे स्वागत करतो.

— सुधाकर शि. गायकवाड

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४९१
काव्य २४००१
१४।१०।८३

REFBK-0024009
REFBK-0024009